# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

("पूर्वीचे पुणे विद्यापीठ")

फोन :०२० २५६२१४६२

Website: www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे ४११००७.


संदर्भ क्र.: प.गो./२०२२/६०

दिनांक: २५/०५/२०२२

अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य /संचालक /विभाग प्रमुख /
संलग्न महाविद्यालये /मान्यता प्राप्त परीसंस्था/
विद्यापीठ शैक्षणिक विभाग

विषय : मार्च/एप्रिल, २०२२ च्या घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ परीक्षांसाठी आवश्यक उत्तरपत्रिका/साहित्याची मागणी व शिल्लक साहित्याबाबत.

महोदय /महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा माहे जुन २०२२ मध्ये पारंपरिक पध्दतीने घेण्याचे नियोजित आहे. आपल्या महाविद्यालयास/मान्यता प्राप्त संस्था व शैक्षणिक विभाग यांना परीक्षांसाठी यापूर्वी २०१९—२० मध्ये वितरीत करण्यात आलेल्या उत्तरपत्रिका/साहित्यापैकी काही उत्तरपत्रिका व इतर साहित्य शिल्लक असल्यास त्या साहित्याचा प्रथम मार्च/एप्रिल २०२२ (नियोजित माहे जून २०२२) च्या परीक्षांसाठी उपयोग करण्यात यावा. तसेच, यापूर्वीची अत्यंत जुनी व जीर्ण झालेल्या उत्तरपत्रिका वापरण्यात येऊ नये व अश्या उत्तरपत्रिका व परीक्षेचे साहित्य आपल्याकडे शिल्लक असल्यास त्यासंबंधीची सविस्तर माहिती स्वतंत्र लेखी पत्रान्वये कळवून सदर साहित्य विद्यापीठ कार्यालयाकडे प्रत्यक्षरित्या आणून जमा करण्यात यावी.

तसेच महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठांचे शैक्षणिक विभाग यांच्याकडे शिल्लक उत्तरपत्रिका व इतर साहित्य साठा असून पून्हा पुर्ण नविन साहित्याची मागणी विद्यापीठाकडे करुन महाविद्यालय स्तरावर इतर कारणास्तव वापर केला जात आहे असेही निदर्शनास आले आहे. सदर साहित्य हे संविधानिक साहित्य असल्याने त्याचा वापर योग्य कारणास्तव होणे आवश्यक आहे. जर असे निदर्शनास आल्यास संबंधीत महाविद्यालय/मान्यता प्राप्त संस्था व शैक्षणिक विभाग यांच्यावर कारवाई करण्यात येईल व तो विषय प्रमाद समिती पुढे ठेवण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

आपला

संचालक
(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)